15 MAR 2025 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील तलाव आंतरराष्ट्रीय विज्ञान पत्रिकेवर


## रासायनिक संयुगांच्या संरचनेच्या प्रतिबिंबाचा आभास; डॉ. सुशीलकुमार जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'जे न देखे रवी, ते देखे कवी' अशी एक म्हण आहे. म्हणजे जे सूर्यालाही दिसत नाही, ते कवीच्या नजरेला दिसते. ही बाब संशोधकांनाही लागू आहे. सतत आपल्या संशोधनाच्या विचारात गुंतलेल्या संशोधकांनाही 'जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी' अशी सर्वत्रच आपल्या संशोधनाची प्रतिबिंबे दिसू लागतात. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक डॉ. सुशीलकुमार जाधव यांच्या बाबतीतही असेच घडले. सनसेट पॉइंट म्हणून प्रसिद्ध असलेल्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग शेजारील तलावामधील झाडाच्या प्रतिबिंबामध्ये त्यांना एका रासायनिक संयुगाच्या संरचनेचा आभास झाला. ते छायाचित्र त्याच ठिकाणाहून त्यांनी टिपले आणि नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या



सुशीलकुमार जाधव




स्प्रिंजर नेचर प्रकाशनाच्या 'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' (मार्च २०२५) या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या मुखपृष्ठावर झळकण्याचा मान या छायाचित्राला लाभला.

स्प्रिंजर नेचर प्रकाशनाच्या 'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' (मार्च २०२५) या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या मुखपृष्ठावर झळकण्याचा मान या छायाचित्राला लाभला. डॉ. जाधव याच्या मार्गदर्शनाखाली शंभूराज कापसे आणि प्रणोती पाटील हे विद्यार्थी संशोधन करीत आहेत. त्यांच्याच शोधनिबंधाच्या विषयास अनुसरून हे मुखपृष्ठ तयार केले. छायाचित्रातील झाडाच्या फांद्या आणि त्याचे पाण्यातील प्रतिबिंब हे ब्रँच्ड-पॉलिथिलिनमाइन या बहुलकाप्रमाणे (पॉलिमरसारखे) दिसते. हा पॉलिमर जलशुद्धिकरणासाठी वापरण्यात येतो. या पॉलिमरद्वारे पाण्यातील सेंद्रिय तसेच असेंद्रिय विषारी घटक वेगळे केले जाऊ शकतात. 'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' या आंतरराष्ट्रीय जर्नलच्या प्रत्येक अंकामध्ये पंधरा ते वीस शोधनिबंध प्रसिद्ध होतात. या सर्वांमध्ये स्पर्धा घेऊन एका शोधनिबंधाशी संबंधित छायाचित्र मुखपृष्ठासाठी निवडले जाते. त्यामधून विद्यापीठ परिसरातील संगीत तलावाचे डॉ. जाधव यांनी घेतलेल्या छायाचित्राची निवड महिन्याच्या मुखपृष्ठासाठी झाली. याचा वापर वैज्ञानिक माहिती कलात्मक पद्धतीने दर्शवण्यासाठी केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील 'संगीत' तलाव आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकेच्या मुखपृष्ठावर

कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा




मजे न देखे रवी, ते देखे कवीफ अशी एक म्हण आहे. ही बाब संशोधकांनाही लागू आहे. सतत संशोधनाच्या विचारात गुंतलेल्या संशोधकांना मजळी, स्थळी, काष्ठी, पाषाणीफ

सर्वत्रच संशोधनाची प्रतिबिंबे दिसू लागतात. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक डॉ. सुशीलकुमार जाधव यांच्या बाबतीत असेच घडले. विद्यार्थ्यांमध्ये सनसेट पॉईंट म्हणून प्रसिद्ध असलेल्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागा शेजारील तलावामधील झाडाच्या प्रतिबिंबामध्ये त्यांना एका रासायनिक संयुगाच्या संरचनेचा आभास झाला. ते छायाचित्र त्याच ठिकाणाहून त्यांनी टिपले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या स्प्रिंजर नेचर प्रकाशनाच्या मर्मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्चफ (मार्च २०२५) आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या मुखपृष्ठावर झळकण्याचा मान छायाचित्राला लाभला.

डॉ. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शंभूराज कापसे व प्रणोती पाटील संशोधन करीत आहेत. त्यांच्याच शोधनिबंधाच्या विषयास अनुसरून हे मुखपृष्ठ तयार केले आहे. छायाचित्रातील झाडाच्या फांद्या व त्यांचे पाण्यातील प्रतिबिंब हे ब्रॅन्च्ड-पॉलिथिलिनमाईन या बहुलकाप्रमाणे (पॉलिमरसारखे) दिसते. हा पॉलिमर पाणी शुद्धीकरणासाठी वापरण्यात येतो. या पॉलिमरद्वारे पाण्यातील सेंद्रिय तसेच असेंद्रिय विषारी घटक वेगळे केले जाऊ शकतात.

- झाडाच्या प्रतिबिंबात रासायनिक संयुगाच्या संरचनेचा आभास
- डॉ. सुशीलकुमार जाधव यांच्या निरीक्षणाचे फलित




'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' या आंतरराष्ट्रीय मानांकित जर्नलच्या प्रत्येक अंकामध्ये साधारण पंधरा ते वीस शोधनिबंध प्रसिद्ध होतात. या सर्वांमध्ये स्पर्धा घेऊन एका शोधनिबंधाशी संबंधित छायाचित्र मुखपृष्ठासाठी निवडले जाते. त्यामधून डॉ. जाधव यांच्या छायाचित्राची निवड झाली. छायाचित्राचा वापर शोधनिबंधातील वैज्ञानिक माहिती कलात्मक पद्धतीने दर्शवण्यासाठी करण्यात आला आहे. डॉ. जाधव आणि संशोधक विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. डी.टी शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.

15 MAR 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातून आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडावेत

## डॉ. दिगंबर शिर्के : शिवस्पदंन क्रीडा महोत्सवात तंत्रज्ञान अधिविभागाला सर्वसाधारण विजेतेपद



कोल्हापूर : विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ.

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधूनही उत्तमोत्तम, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रीडापटू घडावेत, या भूमिकेतून शिवस्पंदन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास सुरवात केली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेत तंत्रज्ञान - अधिविभागाने स्पर्धेमध्ये सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने गतवर्षीपासून कॅम्पसवरील विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा गुणांना संधी प्रदान करण्याचे ठरवून 'शिवस्पंदन' वार्षिक महोत्सवाला प्रारंभ केला. क्रीडा स्पर्धांत यंदा २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न राहता क्रीडापटूंनी आपल्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच क्रीडाकौशल्यांच्या विकासाकडेही लक्ष द्यावे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. स्पर्धेसाठी डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. किरण पाटील, डॉ. राम पवार, डॉ. धनंजय पाटील, डॉ. निलेश पाटील, प्रा. एन. आर. कांबळे, डॉ. विक्रम नांगरे- पाटील, सुभाष पवार, सुचय खोपडे, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. मनीषा शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

15 MAR 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे बक्षीस वितरण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : 'शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधूनही सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडावेत,' अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. विद्यापीठात झालेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरणप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवस्पंदन क्रीडा स्पर्धांचे आयोजनच मुळात जास्तीत जास्त राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, या उद्देशाने केले आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या सुविधांचा वर्षभर लाभ घेऊन कामगिरी उंचावत ठेवावी.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या शिवस्पंदन क्रीडा स्पर्धेतील विजेत्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या खेळाडूंसोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, डॉ. शरद बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या संघांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले.

### 'तंत्रज्ञान'ला विजेतेपद

■ शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात तंत्रज्ञान अधिविभागाने सर्वसाधारण विजेतेपद, तर क्रीडा अधिविभागाने दुसरा आणि गणित अधिविभागाने तिसरा क्रमांक पटकाविला.

15 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ कॅम्पसमधून आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडावेत

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के; शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधूनही उत्तमोत्तम, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रीडापटू घडावेत, या भूमिकेतून शिवस्पंदन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास सुरुवात केली, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात गेल्या आठवड्यात झालेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेत्यांची घोषणा आणि पुरस्कार प्रदान सोहळा क्रीडा अधिविभागाच्या सभागृहात झाला, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. तंत्रज्ञान अधिविभागाने स्पर्धेमध्ये सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने गतवर्षीपासून कॅम्पसवरील विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा गुणांना संधी प्रदान करण्याचे ठरवून 'शिवस्पंदन' वार्षिक महोत्सवाला प्रारंभ केला. याला विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद लाभत आहे. क्रीडा स्पर्धांत गतवर्षी ७०० विद्यार्थी सहभागी झाले. यंदा हाच आकडा २५०० च्या घरात गेला.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. क्रीडा स्पर्धा पार पाडण्यासाठी डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. किरण पाटील, डॉ. राम पवार, डॉ. धनंजय पाटील, डॉ. नीलेश पाटील, प्रा. एन. आर. कांबळे, डॉ. विक्रम नांगरे- पाटील, सुभाष पवार, सुचय खोपडे, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. मनीषा शिंदे, प्रदीप हंकारे यांनी परिश्रम घेतले.

### तंत्रज्ञान अधिविभाग सर्वसाधारण विजेता

या स्पर्धेमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. त्यांना विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला. क्रीडा अधिविभागाच्या संघाने सर्वसाधारण द्वितीय, तर गणित अधिविभागाने तृतीय क्रमांकाने विजेतेपद पटकावले.

15 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वस्थ आरोग्य जीवन पद्धती रुजवा : डॉ. व्ही. एन. शिंदे

**वारणानगर कोडोली :** डॉक्टरांनी घेतलेल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग नैसर्गिक आयुर्वेद उपचारासाठी करून स्वस्थ आरोग्य जीवन पद्धती रुजवली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

कोडोली, ता.पन्हाळा येथील यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयात आयोजित पदवीदान समारंभात ते बोलत होते. ते म्हणाले, अन्न, वस्त्र, निवारा यापेक्षा अन्न, हवा, पाणी मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. ॲलोपॅथी उपचार पद्धती फार गंभीर रुग्णास गरज आहे तेथे वापरा; अन्यथा आयुर्वेद हे प्रतिबंधात्मक जैव प्रक्रिया आहे. रुग्णांची सर्व माहिती संकलित ठेवणे गरजेचे आहे; कारण या माहितीवरून भविष्यात उपचार पद्धती सोपी होण्यास मदत होईल, असे आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे शैक्षणिक परिषदेचे सदस्य पंकज विश्वकर्मा यांनी सांगितले.




**कोडोली : यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात बोलताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ.जयंत पाटील, विनीता पाटील, मिलिंद गोडबोले, डॉ. लक्ष्मण पाटील व इतर.**

यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पदवीदान समारंभात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे शैक्षणिक परिषदेचे सदस्य पंकज विश्वकर्मा यांच्या हस्ते १९५ पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी यशवंत शिक्षण संस्थेच्या विश्वस्त विनीता पाटील, उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत पाटील, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. सचिन वाघमारे, डॉ. आद्रा थोरात, डॉ. राजश्री आवळे, डॉ. अभिजित इंगवले यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मिलिंद गोडबोले यांनी प्रास्ताविकात शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. सूत्रसंचालन मानसी बेलापुरे, सिद्धी बनकर, अनुषा खटावकर यांनी केले, तर आभार डॉ. राजश्री महापुरे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचे अंदाजपत्रकीय बजेट आज

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) बैठक शनिवारी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. सकाळी दहा वाजता सुरू होणाऱ्या या बैठकीत विद्यापीठाचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील सुमारे सहाशे कोटींचे अंदाजपत्रक सादर होणार आहे. या बैठकीत प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर अंदाजपत्रकाचे सादरीकरण केले जाणार आहे. तसेच त्यातील तरतुदी, नवीन योजना आणि विविध मुद्द्यांवर चर्चा होईल. विविध ठराव अधिसभा सदस्यांकडून मांडले जाणार आहेत. विद्यापीठाच्या नामविस्ताराला विरोध करणारा स्थगन प्रस्ताव काही सदस्य मांडणार आहेत. प्रश्नोत्तराच्या तासात महाविद्यालयांची तपासणी, काही महाविद्यालयांकडे तस्लामत प्रलंबित असलेली रक्कम आदींवर चर्चा होणार आहे. दरम्यान, गेल्यावर्षी अधिसभेने ६०१ कोटी ७२ लाख रुपयांचे बजेट मंजूर केले होते. त्यात पाच कोटी ४२ लाख रुपयांची वित्तीय तूट होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2025
लोकमत

# विद्यापीठाची आज अधिसभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आज शनिवारी होणार असून यामध्ये विद्यापीठाच्या नामविस्ताराचा विषय गाजण्याची शक्यता आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक आज सकाळी दहा वाजता राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. याप्रसंगी मागील बैठकीतील इतिवृत्त मंजूर केले जाणार आहे. त्यानंतर एक तास प्रश्नोत्तरे असणार आहेत. विद्यापीठाचे २०२४-२५ चे अंदाजपत्रक मांडण्यात येणार आहे. क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास कक्ष वार्षिक अहवाल सादर केला जाणार आहे. बैठकीत ६८ ठरावांवर चर्चा होणार आहे.

सध्या विद्यापीठाच्या नामविस्ताराचा विषय गाजत आहे. अनेक संघटनांनी हा विषय लावून धरल्याने याचे राजकीय पडसादही उमटत आहेत. हिंदुत्ववादी संघटना हा विषय आक्रमकपणे मांडत आहेत. त्यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. पुरोगामी संघटनांनीही शिवाजी विद्यापीठाचा नामविस्तार करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे. याचे पडसाद अधिसभा बैठकीतही उमटण्याची शक्यता आहे. यापूर्वीही नामविस्ताराची मागणी झाली होती. तो विषय अधिसभेत आल्यानंतर त्याला विरोध दर्शवण्यात आला होता. त्यामुळे आजच्या बैठकीत काय होते, याकडे सर्वांचे लक्ष आहे.


15 MAR
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात मुटकोर्ट स्पर्धेस प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधि विभागात झालेल्या दहाव्या राष्ट्रीय मुटकोर्ट व वादविवाद निवारणे स्पर्धेत राज्यातील १० महाविद्यालयांनी सहभाग घेतला. 'यशस्वी वकील होण्यासाठी कायद्याच्या ज्ञानासह घडामोडींकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे, असे मत निवृत्त न्यायमूर्ती पी. आर. बोरकर यांनी मुटकोर्ट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

ते म्हणाले, 'कायद्याची पदवी घेतल्यानंतर लवकरात लवकर सक्षम होण्यासाठी मुटकोर्ट स्पर्धा उपक्रमात सहभाग घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. कोर्टात युक्तिवाद कसा करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव मुटकोर्टद्वारे विद्यार्थ्यांना मिळतो. यामुळे सक्षम विद्यार्थी तयार होण्यास मदत होते.' विद्यापीठ विधि अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी मुटकोर्ट स्पर्धेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ॲड. गिरीश नाईक ॲड. सूर्यकांत मिरजे, ॲड. संदीप मुतालिक, ॲड. योगेश सावंत, ॲड. नंदकिशोर भगवान, ॲड. अभिजित शितोळे, ॲड. अरविंद पाटील यांनी काम पाहिले. निवृत्त न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. आर. नारायण यांनी संयोजन केले. ॲड. प्रमोद दाभाडे, अक्षय कोल्हापुरे, प्रतीक्षा राजहंस, सुवर्णा कांबळे, शिवानी रामदासी व विद्यार्थी उपस्थित होते.



**१०**

१० महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

## यांनी मिळविले यश

**एलएल.बी. मुटकोर्ट विजेते :** एम. पी. लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

**उपविजेते :** व्हिक्टर डेंटस लॉ कॉलेज, कुडाळ

**एलएल.एम. मुटकोर्ट विजेते :** डिपार्टमेंट ऑफ लॉ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**मेडिएशन रोल प्ले विजेते :** एम. पी. लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर

**उपविजेते :** संजय घोडावत युनिव्हर्सिटी

**बेस्ट रिसर्चर एल. एल. बी. मुटकोर्ट :** वाय. सी. लॉ कॉलेज आणि एम. पी. लॉ कॉलेज

**बेस्ट रिसर्चर एलएल. एम. मुटकोर्ट :** पूजा लोहार - लॉ डिपार्टमेंट, शिवाजी विद्यापीठ

**बेस्ट मुटर एलएल. बी. मुटकोर्ट :** एम. पी. लॉ कॉलेज

**बेस्ट मुटर एलएल. एम. मुटकोर्ट :** रेशमा बेडगकर

**बेस्ट मेडिएटर :** प्रीता बिस्वा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2025

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज अधिसभेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आज शनिवार, १५ रोजी होणार आहे. यामध्ये विद्यापीठाच्या नामविस्ताराचा विषय गाजण्याची शक्यता आहे. तसेच बैठकीत ६८ ठरावांवर चर्चा होणार आहे. सकाळी १० वाजता राजर्षी शाहू सभागृहात ही बैठक होणार आहे. याप्रसंगी मागील बैठकीतील इतिवृत्त मंजूर केले जाणार आहेत. त्यानंतर एक तास प्रश्नोत्तरांचा असणार आहे. विद्यापीठाचा २०२४-२५ अंदाजपत्रक मांडण्यात येणार असून क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास कक्ष वार्षिक अहवाल सादर केला जाणार आहे. सध्या विद्यापीठाच्या नामविस्ताराचा विषय गाजत आहे. याचे पडसाद अधिसभा बैठकीतही उमटण्याची शक्यता आहे. यापूर्वीही नामविस्ताराची मागणी झाली होती. तो विषय अधिसभेत आल्यानंतर त्याला विरोध दर्शवण्यात आला होता. त्यामुळे आजच्या बैठकीत काय होणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2025
पुण्यनगरी

# अन्वेषण संशोधन स्पर्धेत विद्यापीठचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पंजाबमधील चित्कारा विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञानात तृतीय क्रमांक मिळवला. ही स्पर्धा दि. १० व ११ मार्च रोजी झाली. स्पर्धेतील ३ संशोधन शाखांसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत ८ जणांचा संघ सहभागी झाला होता. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या शाखेतून शुभम गिरीगोसावी, बालाजी प्रकाश पाटील व रोहित गणपती गवळी या विद्यार्थ्यांच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थ्यांसोबत समन्वयक म्हणून डॉ. पी. के. पवार, तर संघव्यवस्थापक सुशांत सुरेश पंगम व डॉ. शुभांगी रामचंद्र कांबळे होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 MAR 2025
पुढारी

# जैन गणित-ज्योतिषशास्त्र राष्ट्रीय परिषद उद्या

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासन आणि दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमाचार्य शांतीसागर आचार्य शताब्दी व राष्ट्रसंत विद्यानंद महाराज जन्मशताब्दीनिमीत्त जैन गणित व ज्योतिषशास्त्र राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. रविवारी (दि. १६) स. ९ ते सायं. ५ या वेळेत जैन बोर्डिंग दसरा चौक येथील चतुरबाई हॉलमध्ये परिषद होणार आहे.

परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते स. १० वा. होईल. पहिल्या सत्रात जैन गणित या विषयावर राणी अहिल्याबाई विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. रेणू जैन व इंदोर येथील प्रा. डॉ. अनुपम जैन मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी डॉ. एस. एच. ठकार असणार आहेत. दुपारच्या सत्रात शांतीसागर व राष्ट्रसंत विद्यानंद महाराज यांच्याविषयी डॉ. नेमिनाथ शास्त्री व डॉ. बी. डी. खणे, प्रा. डी. ए. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शन करतील. दुपारी ३ ते ५ या सत्रात जैन ज्योतिषशास्त्र विषयावर डॉ. सम्मेद उपाध्ये व डॉ. पंकज उपाध्ये मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी ज्योतिषतज्ज्ञ डॉ. महावीर शास्त्री मार्गदर्शन करतील. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे, दिगंबर जैन बोर्डिंगचे चेअरमन सुरेश रोटे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.